**पोलीस उप-आयुक्त**
**वाहतुक शाखा यांचेकार्यालय, बंगला नं ६ येरवडा,**
**पोस्ट ऑफीस जवळ,पुणे-४११००६**
**फोननं. :०२०-२६६८८०००** email - dcptraffic.pune@nic.in

जा.क्रं.पोउआ/वाहतूक/प्रे.नो./ /२०२४ दिनांक :-२९/०६/२०२४

## प्रेसनोट

दिनांक ३०/०६/२०२४ रोजीसंत श्री. तुकाराम महाराज व संत श्री. ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालख्या पुणे शहरात एकत्रीत येत आहेत. दोन्ही पालख्यांच्या पुणे शहरातील आगमनामुळे पुणे शहरातील रस्त्यांवर होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी सदरदिवशी पुणे शहर वाहतूक शाखेकडुन काही रस्ते वाहतूकीसाठी बंदकरण्यात येणार आहेत तसेच काही रस्त्यांवरील वाहतूकीमध्ये बदलकरण्यात येणार आहे त्याबाबत पुणे शहर वाहतुक शाखेकडुन नोटीफिकेशन जारी करण्यात आलेले आहे.

पालखीच्या काळात पालखीचा मार्ग, बंदकरण्यात आलेले रस्ते, वाहतूकीतील करण्यात आलेले बदलयांची अचुक माहिती वाहन चालकांना मिळण्यासाठी पुणे शहर आयुक्तालयानेआधुनिकतंत्रज्ञानाचा उपयोग या कामामध्येकरण्यासाठीयावर्षी प्रथमच गुगल सोबतसमन्वय साधुनकामकरत आहे,त्यामुळे पुणे शहरातील नागरिकांना गुगल मॅपवर चालु आणि बंद असलेल्या रस्त्यांबाबत तात्काळ माहिती मिळेल जेणेकरुन वाहन चालकांना योग्यतेनियोजनकरता येईल त्याचप्रमाणे रस्त्यांबाबत गुगल लिंकचा वापरकरता येईल. पालखीचे अनुषंगाने शहरातील वाहतूक बदल, बंद रस्त्यांची माहिती,पालखीचा मार्ग, पालखीचा विसावा ठिकाण, पालखीचा मुक्काम यांची माहिती पाहण्याकरीता https://www.google.com/maps/d/edit?mid=1NudV8Rsb6grJP82jhCKyn3uzeGFSJLI&usp=sharing चा वापरकरावा.

त्याच प्रमाणे श्री क्षेत्रज्ञानेश्वर महाराज पालखी आणि श्री क्षेत्रतुकाराम महाराज पालखी यांची सद्यस्थिती पाहण्याकरिता पुणे पोलीस सोशलमिडीया हँडल वरीलhttp://diversion.punepolice.gov.in/या लिंकचा वापरकरावा.

पालख्यांबाबत माहिती करीता खालील वेब पेजचा वापरकरावा.

(रोहिदास पवार)
पोलीस उप आयुक्त
वाहतूक शाखा पुणे शहर